# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः15.07.2025** **वारःमंगळवार**

---

1. ॲक्सिओम फोर मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अवकाशस्थानकावर गेलेले भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि त्यांचे सहकारी आज दुपारी पृथ्वीवर परतणार
2. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू ओडिशाच्या दौऱ्यावर. आज कटक इथं रवेनशॉ विद्यापीठाच्या 13 व्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहणार
3. भारताचा ऊर्जानिर्मितीच्या क्षेत्रात नवीन टप्पा पूर्ण. जीवाश्मेतर इंधनातून वीजनिर्मितीचं पन्नास टक्के उद्दिष्ट निर्धारित मुदतीच्या पाच वर्षं आधीच पूर्ण
4. रशियातून इंधन, गॅस आणि युरेनियम आयात करणाऱ्या देशांवर शंभर टक्के वाढीव आयातशुल्क लादण्याचा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांचा इशारा आणि
5. अँडरसन तेंडूलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारताचा इंग्लंडकडून निसटता पराभव

**ॲक्सिओम**

ॲक्सिओम फोर मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अवकाशस्थानकावर गेलेले भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि त्यांचे सहकारी आज भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी 3 वाजता पृथ्वीवर परतणार आहेत. स्पेसएक्स ड्रॅगनमधून काल त्यांचा बावीस तासांचा प्रवास सुरू झाला. कॅलिफोर्नियानजीकच्या समुद्रकिनाऱ्यालगत त्यांचं यान उतरणार आहे. परत आल्यानंतर हे अंतराळवीर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी विलगीकरणात राहतील. शुक्ला यांनी आपल्या मुक्कामात भारताच्या दृष्टीनं महत्त्वाचे असणारे सात सूक्ष्मगुरुत्वाकर्षणविषयक प्रयोग केले आहेत. परतीच्या प्रवासाआधी शुक्ला यांनी सर्वांशी संवाद साधला. अंतराळातून दिसणारा भारत आजही अंतराळवीर राकेश शर्मा यांनी 41 वर्षांपूर्वी म्हटल्याप्रमाणे 'सारे जहाँसे अच्छा' असल्याचं शुक्ला म्हणाले...

**कमाल की यात्रा रही है ये मेरी लेकिन अब जैसे मेरी ये यात्रा खत्म होने वाली है आपकी और मेरी यात्रा अभी बहुत लंबी है। हमारी ह्यूमन स्पेस मिशन की जो यात्रा है वो बहुत लम्बी है और बहुत कठिन भी है। लेकिन मैं आपको विश्वास दिलाता हूँ की अगर हम निश्चय कर ले तो तारा अभी थे इवेन स्टार्स अरे अटेनेबल इकतालीस साल पहले कोई भारतीय अंतरिक्ष में गए थे और उन्होंने हमें बताया था की ऊपर से कैसा दिखता है और कहीं न कहीं मुझे लगता है कि हम सब ये जानना चाहते हैं की आज भारत कैसा दिखता है। मैं आपको बताता हूँ आज का भारत स्पेस से महत्वाकांक्षी दिखता है। आज का भारत निडर दिखता है। आज का भारत कॉन्फिडेंट दिखता है। आज का भारत गर्व से पूर्ण दिखता है और इन्ही सब कारणों की वजह से मैं एक बार फिर से कह सकता हूँ की आज का भारत अभी भी सारे जहाँ से अच्छा दिखता है।**

**राष्ट्रपती दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज ओडिशाच्या कटक इथं रवेनशॉ विद्यापीठाच्या 13 व्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहणार आहेत तसंच रवेनशॉ कन्याशाळेच्या तीन इमारतींच्या पुनर्विकासासाठी पायाभरणी करणार आहेत. 15 व्या शतकातले महान

ओडिया कवी आणि विद्वान सरला दास यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती सहभागी होणार असून, कटक मध्ये कलींगरत्न पुरस्कारांचं वितरण त्यांच्या हस्ते होणार आहे. हा दौरा आटोपून राष्ट्रपती संध्याकाळी दिल्लीत पोहोचतील.

**ओदिशा-दुर्घटना**

दरम्यान, ओडिशातल्या बालासोर मध्ये एका महाविद्यालयीन विद्यार्थिनींनं प्राध्यापकानं केलेल्या दुष्कृत्यामुळे आत्मदहनाचा प्रयत्न केला. 95 टक्के जळलेल्या या मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल या विद्यार्थिनीच्या पालकांची भेट घेऊन या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं. पोलिसांनी आरोपीसह,महाविद्यालयाच्या प्राचार्यांना ही ताब्यात घेतलं आहे.

**ऊर्जा निर्मिती उद्दिष्ट**

भारतानं ऊर्जानिर्मितीच्या क्षेत्रात नवीन टप्पा पूर्ण केला आहे. जीवाश्मेतर इंधनातून वीजनिर्मितीचं पन्नास टक्के उद्दिष्ट निर्धारित मुदतीच्या आधीच पाच वर्षं पूर्ण झालं आहे. भारताची एकूण वीजनिर्मिती क्षमता 484 गिगावॅट असून त्यापैकी 242 गिगावॅट वीजनिर्मिती सध्या जीवाश्मेतर इंधनाच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ऊर्जेच्याबाबत भारतानं दाखवलेली कटिबद्धता वास्तवात येत असल्याचं स्पष्ट झालं आहे. नवीन आणि नवीकरण ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी याबाबत समाजमाध्यमांवर संदेश प्रसारित करून भारतासाठी ही घटना ऐतिहासिक असल्याचं म्हटलं आहे. सध्या सगळं जग पर्यायी ऊर्जेच्या शोधात असताना भारत दिशा दाखवत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. 2030 या वर्षापर्यंत जीवाश्मेतर इंधनांच्या मार्फत वीजनिर्मितीचं पन्नास टक्के उदिद्ष्ट ठेवण्यात आलं होतं. मात्र, 2025 मध्येच ते पूर्ण होण्याची घटना प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद आहे, असंही त्यांनी नमूद केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली देश पर्यावरणपूरक ऊर्जेच्या बाबत वाटचाल करत असून, आत्मनिर्भर आणि शाश्वत विकासाची वाट दाखवत आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं आहे.

**तेलंगण पाणी**

तेलंगण आणि आंध्र प्रदेश मधल्या पाणी वाटपाच्या मुद्यावर चर्चा करण्यासाठी केंद्र सरकारनं दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक बोलावली आहे. या बैठकीत तेलंगणचे मुख्यमंत्री ए. रेवंथ रेड्डी आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांच्यासह यांना केंद्रीय जल शक्ती मंत्री सी. आर. पाटील सहभागी होणार आहेत.

**मुख्यमंत्री-किल्ले**

छत्रपती शिवाजी महाराजांनी घडवलेली दुर्ग संपदा ही महाराष्ट्राच्या शौर्याचा वारसा आहे. या ऐतिहासिक किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश होणं, ही संपूर्ण महाराष्ट्र आणि देशासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत काढले. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरीसह महाराष्ट्रातले 11 किल्ले आणि तमिळनाडूतला जिंजी यांचा जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. या ऐतिहासिक क्षणाबद्दल मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, सांस्कृतिक कार्य मंत्रालय, पुरातत्व आणि वस्तूसंग्रहालय संचलनालय आणि यासाठी योगदान दिलेल्या सर्व मान्यवरांचे, महाराष्ट्रातल्या जनतेचे आभार मानले.

**मकोका-सुधारणा**

दरम्यान, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम 2025 अर्थात मकोका कायद्यात सुधारणा करणारं विधेयक काल विधानपरिषदेत एकमतानं मंजूर करण्यात आलं.

**ट्रंप इशारा**

जे देश रशियातून इंधन, गॅस आणि युरेनियम आयात करतात त्यांच्यावर शंभर टक्के वाढीव आयातशुल्क लादण्याचा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी दिला आहे. रशिया युक्रेनबरोबरचं युद्ध संपवण्यात अपयशी ठरत असल्यानं आपण नाखूश

असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. नाटोचे सरचिटणीस मार्क रुट्टे यांनी काल व्हाईट हाऊसमध्ये ट्रंप यांची भेट घेतली. त्यानंतर ट्रंप बोलत होते. रशियानं युक्रेनबरोबर शांतता करार केला नाही, तर वाढीव आयातशुल्क लादण्यासाठी त्यांनी पन्नास दिवसांची मुदत जाहीर केली आहे. ट्रंप यांचा इशारा रशियासाठी असला, तरी त्याचा फटका रशियाकडून मोठ्या प्रमाणावर इंधनाची आयात करणाऱ्या भारताला बसणार आहे.

**कॅनडा रथयात्रा**

कॅनडामधल्या टोरंटोमध्ये रथ यात्रेदरम्यान झालेल्या विघातक कृत्याचा भारतानं तीव्र निषेध केला आहे. या कृत्यासाठी जबाबदार असलेल्या लोकांविरुद्ध कारवाई करण्याची विनंती भारतानं कॅनडाच्या अधिकाऱ्यांना केली आहे.या रथ यात्रेत झालेल्या विघातक कृत्यांच्या अहवालांवर लक्ष ठेवून असल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयांचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी माध्यमांना दिली. हे कृत्य दुर्दैवी असून, ऐक्य आणि सामाजिक सुसंवाद वाढवण्यासाठी आयोजित केलेल्या उत्सवाच्या विरोधी असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**जपान बॅडमिंटन**

जपान खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्विकसाईराज रानकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांचा सामना उद्या पुरुष दुहेरी गटात कोरियाच्या कांग मिन ह्युक आणि की दोंग जू यांच्याशी होणार आहे. टोकियोत आजपासून ही स्पर्धा सुरू होत आहे. सात्विकसाईराज आणि चिराग यांनी यापूर्वी मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेसह अनेक स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी केल्यामुळे त्यांच्यावर भारताची मदार असणार आहे. लक्ष्य सेन आणि पी. व्ही सिंधू हे दोघंही दुखापतीतून बरे झाल्यानंतर या स्पर्धेत सहभागी होत आहेत. लक्ष्यचा सलामीचा सामना चीनच्या वांग झेंग झिंग याच्याशी तर सिंधूचा सामना कोरियाच्या सिंग यू जिनशी होणार आहे.

**फिडे**

जॉर्जियामध्ये सुरू असलेल्या फिडे महिला विश्वकरंडक बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या आर. वैशाली आणि हरिका द्रोणवल्ली यांनी उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. कोनेरू हम्पी आणि दिव्या देशमुख यांनी यापूर्वीच अंतिम 16 मध्ये प्रवेश केला आहे. उपउपान्त्य फेरीत वैशालीचा सामना कझाकीस्तानच्या मेरुएर्ट कामलिडेनोवा तर द्रोणवल्लीचा सामना रशियाच्या कॅटरीना लागनोशी होणार आहे. दिव्या देशमुखचा सामना चीनच्या झू जिनरशी तर कोनेरू हम्पीचा सामना स्वित्झर्लंडच्या अलेक्जेंड्रा कोस्टेनियुकशी होणार आहे.

**क्रिकेट**

इंग्लंडविरुद्धच्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारताला 22 धावांनी पराभव पत्करावा लागला. यजमान संघानं दिलेल्या 193 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा डाव 170 धावांवर आटोपला. भारतानं काल 4 बाद 58 धावांच्या पुढे खेळ सुरू केला; रविंद्र जडेजानं सर्वाधिक 61 धावा केल्या; मात्र त्याची एकाकी झुंज अपयशी ठरली. या विजयामुळे पाच सामन्यांच्या या मालिकेत इंग्लंडनं 2-1 अशी आघाडी घेतली आहे. मालिकेतला चौथा सामना ओल्ड ट्रफोर्ड इथं खेळवला जाणार आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.